# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/03/2023 (सोमवार) सकाळ

---

## घरफोडी

**पो.स्टे. कन्हान** :- अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील वार्ड क्र. ०३ पानदंन रोड हनुमान नगर कन्हान येथे दिनांक २५/०३/२०२३ चे २०.३० वा. ते २१.३० वा. सुमारास फिर्यादी नामे- सुमेध देवराज नीतनवरे, वय ३४ वर्ष रा. वार्ड क्र. ०३ पानदंन रोड हनुमान नगर यांचे घराचे आत प्रवेश करून एक ओपो कंपनीचा काळया रंगाचा ए १६ ई मोबाईल किंमती अंदाजे ९९९९/- रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रविण चव्हाण ब. नं २८८ पोस्टे कन्हान मो. नं ८४२१४३३९२९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :- अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील साखर कारखाना कॉनली बाबदेव येथे दिनांक २६/०३/२०२३ चे १४.०० वा. ते दिनांक २७/०३/२०२३ चे ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे- सचिन दिलीप सिंगनापुरे, वय ३२ वर्ष, रा. साखर कारखाना कॉनली बाबदेव ०६ हे आपल्या चुलत बहीणीचे साक्षगंध असल्याने दि. २६/०३/२०२३ रोजी दुपारी १४.०० वा. काकाचे घरी नागपुर येथे गेले होते. दि. २७/०३/२०२३ रोजी सकाळी ०८.३० वा. त्यांचे घराशेजारी राहणारे रंजीत यादव यांनी फोन करून सांगीतले की, तुमच्या घराचा लॉक तुटलेला दिसत आहे. त्यावर फिर्यादी हे १०.३० वा. घरी आले असता फिर्यादीला मेन दरवाज्याला लावलेला लॉक तुटलेला दिसला व घरातील अलमारीमध्ये ठेवलेले १) ०५ ग्रॅम सोन्याची अंगठी किंमती अंदाजे १३,०००/- रू. २) ०३ ग्रॅम सोन्याची बिरी किंमती अंदाजे ८,०००रू ३) ०२ ग्रॅम सोन्याचे पदक किंमती अंदाजे ४,०००/- रूपये ४) नगदी १५,०००/- रूपये ५) मोटर सायकल क्र. MH- 40 AH- 2470 किंमती अंदाजे १०,०००/- रू असा एकुण ५०,०००/- रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने घराचे मेन दरवाज्याचा लॉक तोडुन चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा भगवान चांदेवार मो.क्र. ९७६५२२१११६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष  
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर